ISSN: 2347-2723 Impact Factor : 2.0260(UIF) Volume - 4 | Issue - 2 | September - 2016

Review of Literature

# ''महात्मा गांधी आणि हिंदू–मुस्लीम ऐक्य''


प्रा. खाबडे प्रभूदास आनंदराव
राज्यशास्त्र विभाग , श्री.विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठ वडगांव.

## प्रस्तावना :–

महात्मा गांधीच्या आगमनाने स्वातंत्र्य चळवळीला एक नवचैतन्य प्राप्त झाले. स्वातंत्र्य चळवळ शहरातून ग्रामीण भागापर्यंत पोहोचली. लोकसहभाग वाढत गेला. बंदिस्त अधिवेशन, कामकाज करणारी कॉंग्रेस चळवळ ही परिषदा, मोर्चे माध्समातून रस्त्यावर दिसू लागली. स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये गांधीचळवळीचा प्रामुख्याने वाटा असलेला दिसतो. स्वातंत्र्य मिळवणे व बरोबर एकसंघ नवराष्ट्र निर्मिती, सर्वधर्मसमभाव यांचा पुरस्कार गांधीनी केला. गांधी 'हिंदू-मुस्लीम' ऐक्याचे कट्टर पुरस्कर्ते. आपले संपूर्ण आयुष्य 'हिंदू-मुस्लीम' ऐक्यासाठी गांधीनी खर्च घातले. या 'हिंदू-मुस्लीम' ऐक्य विरोधी धर्मांध व्यक्तीकडून त्यांचा शेवट झाला. धर्माधता त्यासंबंधिचे धोक, राष्ट्रवादातील अडचणी त्यांनी स्पष्ट करून नवभारत उभारणीमध्ये 'हिंदू-मुस्लीम' ऐक्यांच्या विचाराचा पुरस्कार केला.

## गांधीचे धर्माविषयक विचार :–

ईश्वर आणि मानव एकच आहे. सर्वधर्म मानवतावादी आहेत. गांधीनी विश्वव्यापक सर्वधर्म समभाव संकल्पना आयुष्यभर आचरणात आणली. त्यासाठी त्यांनी सुसंगत धर्म विचार, तत्वज्ञानी मांडणी केली त्यांच्यामते धर्म हे शुध्द व्यक्तीगत बाब आहे. ईश्वराची संकल्पना प्रत्येकाच्या मनामध्ये वेगवेगळी असते. त्यामूळे जेवढया व्यक्ती तेवढे धर्म म्हणावे लागतील. कोणत्याही धर्म सक्ती करत नसतो. १. हिंदू धर्माची प्रतिष्ठा अजिबात कमी न करता इस्लाम, खिस्ती, ज्यू इ. धर्मातील श्रेष्ठत्वाला मान देऊ शकतो. मानवता, बंधूभाव यावर इस्लामचा विश्वास आहे. पण हा



बंधूभाव, मानवता केवळ इस्लामपूरती मर्यादीत नसून ती विश्वात्मक आहे. सर्व धर्माबददल सारखाच आदर बाळगल्यास धर्माधर्मातील संघर्ष निर्माणस होण्याचे कारण असणार नाही. २. प्रत्येकाने सहिष्णूवृत्ती अंगी बाळगल्यास धर्माधता, कर्मठता, दहशतवाद थांबविणे शक्य होईल. गांधीच्यामते एकाच वृक्षाची पाने या दृष्टीने तुम्ही सर्व धर्माकडे पाहता तेव्हा ती वेगवेगळी दिसतात. पण बुध्याकडे सर्व धर्म एकच आहेत. याचे मुलभूत आकलन झाल्यास धर्माधर्मावर झालेली युध्दे थांबतील. हिंदूनी गितापारायणाबरोबरच कुराण, ग्रंथसाहेबही वाचावे, पवित्र मानावे असे सर्वांनी केल्यास संघर्ष निर्माण होणार नाही. या सर्वधर्मसमन्वयाच्या सिध्दांत विचारावर त्यांनी राष्ट्रवादाची मांडणी केली.

## महात्मा गांधीनी हिंदू–मुस्लीम ऐक्य विचार :–

३.गांधीनी तत्कालीन युरोपमधील राष्ट्रसंकल्पनेच्या विचाराला विरोध करत 'हिंदू-मुस्लीम' मधून स्वातंत्र्य, सामाजिक बांधिलकी संमिश्र संस्कृती, मानवतावाद यांचा पुरस्कार केला. 'हिंदू-मुस्लीम' एकसंघ राष्ट्रवादाची समर्थक मांडणी केली. मुस्लीम, खिश्चन समाजाचे हित जोपासणे म्हणजे हिंदू विरोध कृत्य यास त्यांनी विरोध केला. ४. 'हिंदू-मुस्लीम' हाडवैर या शब्दास गांधीनी विरोध करून हा शब्द म्हणजे एकसंघ राष्ट्रविरोधी, ऐक्य विरोधी ब्रिटीश धर्मांध विचारांनी शोधलेला शब्द आहे असे म्हटले. मं. गांधीनी 'हिंदू-मुस्लीम' संघर्ष नाकारत. पण हा संघर्ष त्यांनी इतिहासकालीन राजकीय सत्तासंक्रमण काळातील म्हटला आहे. राजकीय सत्तांना जसजशी स्थिरता येऊ लागली तशी संघर्षाची धार बोथट होत गेली. पुढे 'हिंदू-मुस्लीम' जातीय संघर्ष न राहता कालांतराने त्याचे रूपांतर राजकीय सत्तासंघर्षात झालेले दिसून येते, असे गांधी म्हणतात. त्यासाठी त्यांनी ऐतिहासीक उदाहरण म्हणून अकबर बादशहाचा कालखंड, रजपूत, जाट, मराठे या 'हिंदू-मुस्लीम', राजांच्या मध्ये सत्ता टिकविण्यासाठी ते कसे एकमेकाविरोधी धर्मबाजूला ठेऊ न एकत्र येतात हे दर्शविले आहे. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात मोगल बहादुरशहा जफर याचे निशान व नेतृत्व ब्रिटीशविरोधी लढ्याचे प्रतिक म्हणून सर्वांनी स्विकारले होते याकडे ते लक्ष वेधतात.

म. गांधी यावरच न थांबता 'हिंदू-मुस्लीम' ऐक्यविचार मांडणी सांस्कृतिक, वांशिक संदर्भातून करतात. 'हिंदू-जैन' धर्मातही वेगवेगळे पंथ आढळतात. म्हणून काय ते एक राष्ट्र होऊ शकत

नाही काय? मुस्लीम समाजातील बहुसंख्य जनता ही पुर्वीची हिंदू धर्मातून धर्मांतरीत असून आपले व त्यांचे पूर्वज एकच आहेत. आपण सर्वजण एकाच रक्तामांसाचे आहोत. ५ आचरण पध्दती बदलली म्हणजे? ते राष्ट्राचा भाग नव्हे काय? असे गांधी म्हणतात. हिंदूस्थान हिंदूचाच आहे असे हिंदूनी मानल्यास ते एक स्वप्न आहे. तसेच मुसलमान समजू लागल्यास तेही स्वप्न समजावे. ६. गांधी पुढे म्हणतात'हिंदू-मुस्लीम' एक असून त्यांच्यात एकतेची, राष्ट्रीयत्वाची भावना आहे. ब्रिटीश साम्राज्याच्या अगोदर 'हिंदू-मुस्लीम' यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना नव्हती. हिंदूस्थानात राष्ट्रवादाची भावना रेल्वे, दळणवळण साधने ई. ब्रिटीश सुधारणेने झाली. ७. यास महात्मा गांधी विरोध करतात. साम्राज्य स्थिरतेसाठी 'हिंदू-मुस्लीम' ऐक्य अस्थिर करण्यास धर्मांध, राजकीय विचार नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यास ब्रिटीशांनी सुरूवात केली, अशी टिका गांधी करतात.

गांधी 'हिंदू-मुस्लीम' ऐक्य बाबत म्हणतात की, ''टाळी दोन्ही हातांनी वाजते, मला जर तंटा करायाचा नसला तर मुलसमान काय करीत? आणि मुस्लीमांना करायचा नसला तर मी काय करू शकणार आहे? हवेत हातवारे करणा-यांचा हातच निखळतो. प्रत्येकाने जर आपल्या धर्माचे स्वरूप समजावून घेऊन त्यांस चिटकून राहून आणि शास्त्री-मुल्लांना लुडबूड करू न दिल्यास तंट्याचे नांवच उरणार नाही.'' ८. गांधीच्या मते दोन्ही जमातीत परस्पर अविश्वास आहे. मुसलमान ब्रिटीशांकडे हक्क मागतात. त्यांस हिंदूनी विरोध का करावा. हिंदूनी विरोध न केल्यास ब्रिटीश अस्थिर होऊन मुलसमानांचा हिंदूवर हळूहळू विश्वास, बंधूभाव वाढेल. आपले भांडणस आपणच मिटविणे आवश्यक आहे. ब्रिटीश शासनाकडे जाऊ नये. गांधीच्या मते जो मनुष्य दुस-याचा विश्वास संपादन करू शकतो तो कधी, काही गमावित नाही. ९. हिंदू-मुस्लीमातील परस्पर अविश्वास संघर्षाचे कारण आहे. एकमेकांबददल विश्वास निर्माण शत्रुत्व उरणार नाही. ''आजचा मित्र उद्याचा शत्रु असू शकतो. त्यामूळे आजच्या मित्रापासून सावध रहा.'' असा संकेत असलेला दिसतो. पण गांधी म्हणतात की, हे चुकीचे असून ''आजचा शत्रु उद्याचा मित्र असू शकतो म्हणून आजपासून त्याच्यावर विश्वास ठेवायला सुरूवात करा.''

१०. संपूर्ण देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना मात्र 'हिंदू-मुस्लीम' ऐक्यास तडे जाऊ लागले. यांच्यातील दरी रूंदावत गेली. देशाची फाळणी अटळ आहे असे बहूतेक कॉंग्रेस नेते म्हणू लागले. १९४७ ला भारत-पाक स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली. गांधीचे एक स्वप्न स्वातंत्र्याच्या रूपात साकार झाले. तरीही गांधी संतुष्ठ नव्हते. ११. कारण फाळणीने एकसंघतेने स्वप्न भंग पावले होते. गांधी स्वातंत्र्याच्या जल्लोषात सहभागी न होता फाळणीने भंगलेल्या 'हिंदू-मुस्लीम' दंगली शमविण्यासठी, होरपळून निघालेल्यांची सेवा सुश्रा करण्यासाठी नोआखलीत गेले. तत्कालीन व्हॉईसरॉय माऊंटबॅटन यांनी पन्नास हजार सेना जे कार्य करू शकली नाही ते कार्य गांधींनी शांततेने प्रस्तापित केले अशी प्रशंसा केली. महावीर बुध्द यांच्यापासून प्रेरणा घेवून गांधीनी जगापूढे ठेवलेला अहिंसेचा व शांतेचा संदेश केवळ जातीय दंगली, दहशतवाद, हिंसाचार थांबविण्यापुरताच मर्यादित नाहीतर जागतिक शांतता, विश्वराज्य, अखंड मानव जातीचे कल्याण, धर्मनिरपेक्षता यासाठी असलेला दिसतो.

१२. म. गांधीच्याकडे केवळ एक मोठे राजकीय पुढारी एवढ्याच दृष्टीने आता आपण पाहत नाही. म.गांधी क्रांतीकारी आहेत परंतू आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व क्रांतीकारकांहून ते निराळे आहेत. गांधी एक धर्मपुरूष आहेत परंतू आजपर्यंत होऊ न गेलेल्या धर्मपुरूषाहूनही ते विभिन्न आहेत. गांधी एक राजकीय नेते आहेत परंतू इतर सर्व राजकीय नेत्याहून ते निराळे आहेत.
गांधी अतित नही भविष्य भी है!

### *महात्मा गांधी –*


१) डॉ. भोळे भा.ल. – आधुनिक राजकीय विस्तार
२) जावडेकर आचार्य शं.द. – आधुनिक भारत
३) सारथी अरूण – शोध महात्मा गांधींचा – खंड एक
४) बेन्नूर फररूद्दीन – महात्मा गांधी प्रणित इतिहासशास्त्र
५) महात्मा गांधी – 'हिंदी – स्वराज्य'
६) मंगळवेढेकर राजा – गांधी जीवन दिपीका
७) साधना – सप्टेंबर २००७